web: http://navakal.org,
e-mail- info@navakal.org

वर्ष-८९ | अंक-३६० | मुंबई | सोमवार ५ मार्च २०१२ | संपादक : सौ. जयश्री खाडिलकर-पांडे | पाने-८ | किंमत:₹ २

REGD. No. MH/MR/SOUTH-143/2012-14

एकमेव स्वतंत्र दैनिक

नवाकाळ

एक चळवळ

## वसईत मातेने दिला तिळ्यांना जन्म

वसई, ता. ४ - वसई तालुक्यातील मनपा हद्दीतील सरकारी रुग्णालयात एका मातेने ३ बालकांना जन्म दिल्याची घटना घडली आहे. विशेषत; या महिलेची प्रसूतीही अगदी साधारण झाली असून तिनही बालके व माता सुखरूप असल्याचे येथील डॉक्टरांनी सांगितले. वसई विभागातील मनपा हद्दीतील सर डी.एम. पेटंट रुग्णालयात तीनही बालकांना जन्म १० मिनिटांच्या अंतराने झाला असून त्यामध्ये २ मुले व १ मुलगी आहे. सौ. रेश्मा राजेश गायकवाड रा. आपोलो गाव, नालासोपारा (पू) असे या मातेचे नाव आहे. दरम्यान अवघड असणारी ही प्रसूतीक्रिया पार पाडणाऱ्या डॉ. अश्विनी माने व डॉ. विनय माने यांच्या पथकाचे रेश्माच्या नातेवाईकांनी आभार मानले आहेत. याव्यतिरिक्त या रुग्णालयात तिळ्यांचा जन्म होणारी ही पहिलीच घटना आहे.

# सुहासिनी लोखंडे नक्कीच राष्ट्रवादीबरोबर

# सेना-भाजपाच्या हिंसक संपाची हवाच गेली

# हातावर घड्याळ बसताच लोखंडाचे सोने झाले



ठाणे, ता. ४ - ठाण्यातील महापालिकेचा सत्ता-संघर्ष शिगेला पोहोचला आहे. शिवसेना-भाजपा-रिपाइं महायुती आणि राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेस पक्षाची आघाडी ठाण्याची सत्ता मिळविण्यासाठी इरेला पेटली आहे. त्यातून ठाण्यात महाभारत घडत आहे. भाजपा नगरसेविका सुहासिनी लोखंडे गेले ९ दिवस बेपत्ता राहिल्यानंतर महायुतीने काल मध्यरात्री घाईने ठाणे बंद पुकारला. आज बसेस व रिक्षा फोडल्या. सर्व दुकाने व सर्व व्यवहार ठप्प करून ठाण्यात प्रचंड तणाव निर्माण केला. मात्र, तेवढ्यात प्रचंड राजकीय खेळी झाली. स्वतः सुहासिनी 'स्टार माझा' वृत्तवाहिनीवर आल्या व त्यांनी सांगितले की, 'मी सुरक्षित आहे. मी देवदर्शनाला आले आहे. माझ्यावर कुणाचा दबाव नाही. मी सहा तारखेला पालिका सभागृहात येईन व मतदान करीन. माझे म्हणणे हेललाईन बनवा म्हणजे ठाण्यातील तोडफोड थांबेल. मी माझ्या इच्छेप्रमाणे मतदान करणार आहे.' सुहासिनी लोखंडे यांच्या या खुलाशाने महायुतीच्या ठाणे बंदची हवाच निघून गेली.

### सुहासिनी लोखंडेंबरोबर हा बारक्या कशाला?

भाजपाच्या बेपत्ता नगरसेविका सुहासिनी लोखंडे यांना राष्ट्रवादीचा गुंड बारक्या यानेच अपहरण करून नेले आहे, असा आरोप भाजपाचे शहरप्रमुख संदीप लेले यांनी केला आहे. बारक्या याच्यावर खुनासहीत सहा गुन्हे दाखल झालेले असून ज्यावेळी सुहासिनी निघून गेल्या त्यावेळी त्यांच्याबरोबर बारक्या होता. हा बारक्या त्यांच्याबरोबर कशाला? असा प्रश्न उपस्थित करून लेले यांनी राष्ट्रवादीवर संशय व्यक्त केला आहे.

त्यामुळे आता सुहासिनी लोखंडे या मतदानास हजर राहणार नाही. हे सिद्ध झाले असून आता ठाण्यातील महापौरपदाच्या चाव्या मनसेच्या हातात आहेत. मनसे ज्याच्या पाठिशी उभी राहील त्यालाच ठाण्याची सत्ता मिळण्याची शक्यता आहे. ठाण्यातील बहुमताचा आकडा गाठण्यासाठी शिवसेना-भाजपा-रिपाइं महायुती आणि राष्ट्रवादी काँग्रेस व काँग्रेस यांच्यात तुंबळ रस्सीखेच सुरू आहे. अपक्ष, रिपाइं व बसपाचे नगरसेवक फोडण्यासाठी महायुतीने व आघाडीने गळ टाकली आहे. अशाच आघाडीच्या गळाला भाजपाच्या सुहासिनी लोखंडे लागल्या आहेत.

सुहासिनी लोखंडे या भाजपाच्या नौपाडा येथील प्रभाग क्रमांक ४५च्या नगरसेविका आहेत. २२ फेब्रुवारीला कोकण विभागीय आयुक्तांसमोर प्रतिज्ञापत्र सादर केल्यावर सुहासिनी लोखंडे २४ फेब्रुवारीपासून कुटुंबासहित बेपत्ता आहेत. सुहासिनी लोखंडे यांचा मुलगा दहावीच्या परिक्षेला न बसता आईबरोबर आहे. सुहासिनी लोखंडे बेपत्ता झाल्यामुळे शिवसेना-भाजपा महायुतीने राष्ट्रवादीचे आमदार

पुढील मजकूर पान ८ वर

## वैश्य सहकारी बँकेची चौकशी अहवाल
## ४५ कोटींच्या ठेवीबाबत कर्मचारी दोषी

मुंबई, रविवार - वैश्य सहकारी बँकेच्या गिरगांव शाखेत ८७ खाती उघडून ४५ कोटी रुपये ठेवून नंतर काढण्यात आले. या तक्रारीची चौकशी करून सहकारी संस्था विशेष लेखापरीक्षकाने अहवाल सादर केल्याचे कळते. दुर्दैवाने या चौकशीत बँकेची श्रेणी घसरल्याचेही उघड होत आहे.

४५ कोटींच्या व्यवहाराबाबत बँकेच्या दोघा कर्मचाऱ्यांना दोषी धरण्यात आले असून रिझर्व्ह बँकेने भविष्यात दंड आकारला तर हा दंड या दोघांकडून वसूल केला जाणार आहे. ही रक्कम नंतर आरटीजीएसद्वारा विविध बँकांत हस्तांतरित करण्यात आली. हा पैसा दहशतवादी कारवायांसाठी वापरला का? यातून काळा पैसा निर्माण झाला का? राज्य शासनाचा महसूल बुडाला का? याची चौकशी सक्षम स्वतंत्र यंत्रणेने करावयीच आहे.

वैश्य बँकेच्या बोरिवली शाखेतून तिघांना २६ लाख ५० हजार रुपये वाहन कर्ज देण्यात आले. हे तिघेही बँकेचे सभासद नसताना त्यांना कर्ज दिले. त्यांच्या निवासाची व काम करीत असलेल्या ठिकाणी जाऊन शहनिशा न करता कर्ज देण्यात आल्याने बँकेची रक्कम बुडाली, असा ठपका ठेवण्यात आला असल्याचे कळते.

रिक्षावाटप कर्जाच्या प्रकरणातही बनावट कागदपत्रे आणि नियमबाह्य वाटपाचा ठपका ठेवल्याचे कळते. हा चौकशी अहवाल आता पुण्याला सहकार खात्याकडे पाठविण्यात आला आहे.

### सोमवारी 'मंगळ' येणार पृथ्वीच्या जवळ!

मुंबई, रविवार - उद्या सोमवार ५ मार्च रोजी मंगळ हा ग्रह साध्या डोळ्यांनीही स्पष्टपणे दिसू शकणार आहे. कारण या दिवशी मंगळ ग्रह पृथ्वीच्या जवळ येणार आहे. या दोन्ही ग्रहांमधील अंतर दहा कोटी सात लक्ष किलोमीटरने कमी होणार आहे.

### चिंचा काढताना शॉक लागून बालकाचा मृत्यू

जळगाव, ता. ४ - झाडावर चिंचा काढताना हातातील ओली काठी वीज तारेवर पडल्याने शॉक लागून रामा रामसिंग सोनवणे (८) हा मुलगा जागीच ठार झाल्याची घटना जामनेर येथे घडली.

**शुभराशी- ४,६,७**

## कशेडी घाटात बस कोसळली
## पनवेलची महिला ठार, १३ जखमी

रत्नागिरी, ता. ४ - आज पहाटे ४ वाजता मुंबई-गोवा महामार्गावरील खेड शहराजवळच्या कशेडी घाटात भीषण अपघात घडला. मुंबईहून रत्नागिरीकडे जाणारी खाजगी लक्झरी बस चक्री वळणावर दरडीला धडकून कशेडी घाटात कोसळली. या अपघातात पनवेलमध्ये राहणारी ६० वर्षांची वृद्ध महिला जागीच ठार झाली. तर अन्य १३ प्रवासी जखमी झाले. त्यापैकी दोघांची प्रकृती गंभीर आहे. अपघातातील मृत महिलेचे नाव सरिता जगन्नाथ कदम (६०) रा. नवीन पनवेल असे आहे.

अपघातग्रस्त लक्झरी बस घाडगे-पाटील ट्रान्सपोर्टची असून ही बस मुंबईहून रत्नागिरीकडे चालली होती. पहाटे ४ वाजता ही बस कशेडी घाटात आली. त्यावेळी बस चालक ज्ञानेश्वर राजाराम कदम हा पुसेसावळी, ता. खटाव याचा गाडीवरील ताबा सुटला आणि गाडी दरडीवर आदळून घाटात कोसळली.

या अपघातात जखमी झालेल्यांची नावे- अक्षय भोसले (४२), ईश्वर पिपारडे

पुढील मजकूर पान ८ वर

## यशवंतराव अप्रतिम
### आचार्य अत्रे यांच्या कन्येचा अभिप्राय



आचार्य अत्रे यांची कन्या व सुप्रसिध्द कवयित्री सौ. शिरीष पै यांनी आज 'नवाकाळ'ला सांगितले की, अग्रलेखांच्या बादशहाचे 'यशवंतराव' हे पुस्तक अप्रतिम आहे.

'यशवंतराव' चरित्र नसून चारित्र्य आहे आणि ते संपन्न आहे. यशवंतरावांचे खास व्यक्तिमत्व या पुस्तकात उभे केले आहे. पुस्तक वाचताना यशवंतरावच दिसू लागतात. मी माझ्या मुलाला 'यशवंतराव' वाचण्यास आग्रहाने सांगितले.

नीलकंठ खाडिलकरांची भाषा फार सुंदर आहे. प्रासादिक आहे. मी सर्वांना सांगते की, 'यशवंतराव' पुस्तक अप्रतिम आहे, जरूर वाचा.

## विवाहाला विरोध करताच प्रेमीयुगुलाची विष पिऊन आत्महत्या

बारामती, ता.४- मुलीच्या घरच्यांनी लग्नाला विरोध करताच, एका प्रेमीयुगुलाने 'एक दुजे के लिए' चित्रपटातील 'वासू-सपना' प्रमाणे एका गाडीत विषप्राशन करून हातात-हात घेऊन आत्महत्या केली. बारामतीजवळील पनदरे गावात एका गाडीत या प्रेमीयुगुलाचे मृतदेह आढळले. अविनाश गायकवाड (२२) व ज्योती साळवे (१७) अशी या प्रेमीयुगुलाची नावे आहेत. शुक्रवारी रात्री या प्रेमीयुगुलाने गाडीतच विष पिऊन आत्महत्या केली. रात्रभर तिथे गाडी उभी असल्याने बँक ऑफ इंडियाच्या कर्मचाऱ्यांना संशय आला. त्यांनी पोलिसांना कळविले असता, वडगाव-निंबाळकर गावातून बेपत्ता झालेले प्रेमीयुगुल हेच असल्याचे आढळून आले.

याबाबत हकीकत अशी की, ज्योती साळवे व अविनाश गायकवाड हे एकमेकांवर गेल्या ५ वर्षांपासून प्रेम करीत होते. अविनाश हा बारामतीमधील माळेगाव येथील रहिवाशी ठोंबे यांच्या गाडीवर ड्रायव्हर होता. हा अविनाश मूळचा बुलढाणा जिल्ह्यातील मुढाळे या गावातील आहे. अविनाशच्या घरच्या लोकांनी सोलापूरच्या करमाळा तालुक्यातील खानोटा गावातील मुलीशी अविनाशचा साखरपुडा केला होता. मात्र, अविनाशला ज्योतीशीच लग्न करायचे होते. त्यामुळे या दोघांनी जोडीने आत्महत्त्या करण्याचा निर्णय घेतला. अविनाशने आपली गाडी घेऊन पनदरे गाव गाठले व तेथे दोघांनी गाडीतच विष पिऊन आत्महत्या केली. या प्रेमीयुगुलाच्या आत्महत्येमुळे बारामतीमध्ये खळबळ माजली.

## धरण असलेल्या गावात पाणी नाही! कुणकेरी ग्रामपंचायतीवर घागर मोर्चा

सिंधुदुर्ग, ता. ४ - पाळणेकांड धरण गावात असताना कुणकेरी गावालाच पिण्यासाठी पाणी मिळत नसल्यामुळे गावातील पळसवळा, मधलीवाडी व पिंपळवाडीतील महिलांनी काँग्रेसच्या कुणकेरी ग्रामपंचायतीवर घागर मोर्चा नेऊन महिला सरपंच सौ. अश्विनी मेस्त्री यांच्यासह ग्रामसेवक अर्जुन कुबल आणि ग्रा. पं. सदस्यांना जाब विचारला. मोर्चाचे निवेदन यापूर्वी सादर करूनही पाणीपुरवठा समितीचे अध्यक्ष तथा उपसरपंच लक्ष्मण सावंत अनुपस्थित राहिल्याबद्दल महिलांनी ग्रा.पं. कार्यालयात हंगामा करून पाणी द्या अन्यथा खुर्च्या खाली करा, असा इशारा दिला. थेंब थेंब पाणी मिळते. विहिरी आटलेल्या, पाणी प्यायचे कुठले? नळ पाणीपाईप लिकेज आहेत, पाणी द्या अन्यथा खुर्च्या खाली करा या मागणीसाठी कुणकेरी गावातील महिलांनी घागर मोर्चा ग्रामपंचायतीवर धडकला.

सुमारे एक तासाच्या प्रतिक्षेनंतर कुणकरी ग्रा.पं. कार्यालयात सरपंच सौ. मेस्त्री आल्या. मात्र, उपसरपंच तथा पाणीपुरवठा समितीचे अध्यक्ष अनुपस्थित राहिल्याने महिला भडकल्या. जनतेच्या जीवन मरणाच्या प्रश्नांची देणं-घेणं नसलेल्या या पदाधिकाऱ्यांची तीव्र शब्दात त्यांनी नाराजी व्यक्त केली. नळ पाणी बिलाच्या थकितांची नावे जाहीर करा, त्यांचा पाणीपुरवठा तत्काळ बंद करा, पाणी पाईपलाइनचे लिकेज तत्काळ दुरुस्त करा. विहिरीची साफसफाई करून पाणीपुरवठा सुरळीत करा. जवाहर योजनेमध्ये पाणीपुरवठा का केला नाही, असे सवाल करीत महिलांनी सरपंच मेस्त्री व ग्रामसेवक कुबल यांना भंडावून सोडले. त्यानंतर शिवसेना ग्रा.पं. सदस्य सुनील परब हे आले असता पाण्याच्या मागणीचा जोर आणखीनच वाढला. अखेरीस पाणी टंचाईप्रश्नी खास ग्रामसभा बोलावून तोडगा काढण्याचे आश्वासन दिल्यानंतर महिला शांत झाल्या.

# अंधांसाठी मोबाईल



**मी जेव्हा सार्वजनिक ठिकाणी मोबाईलवर एसएमएस टाईप करीत असतो तेव्हा अनेक जण कुतूहलाने चौकशी करतात. अंध असून मी टाईप कसा करतो असा त्यांना प्रश्न पडतो. डिजिटल तंत्रज्ञानामुळे आम्हा अंधांना सहाय्यकारी अशी नवी सॉफ्टवेअर मोबाईलमध्ये उपलब्ध झाली आहेत. टेक्स्ट टू स्पीच सिस्टीम सोबतच्या स्क्रीन रीडर्स सॉफ्टवेअरमुळे आम्ही आता मोबाईल अधिक नेमकेपणाने वापरू शकतो. त्याचा डोळसांसारखा वापर करू शकतो.**



हर्षद जाधव
७७३८७८२७२६
राष्ट्रीय दृष्टिहीन संघ, महाराष्ट्र

खरेतर, भारतात बऱ्याच वर्षांपासून अनेक अंध व्यक्ती टेलिफोन बूथ अथवा दूरध्वनीचालक म्हणून कामे करीत आहेत. मोबाईलही सामान्यांच्या आवाक्यात आल्यापासून सर्वसाधारण डोळस व्यक्ती जे मोबाईल्स वापरतात ते अंध व्यक्तीही वापरत आले आहेत. टेलिफोन असो, मोबाईल असो वा नंबर पॅड असलेली कॅल्क्युलेटरसारखी अन्य कोणतीही इलेक्ट्रॉनिक वस्तू असो, अंध व्यक्तींना ती वापरता यावी यासाठी तिच्या पाचव्या क्रमांकाच्या कीवर बोटाच्या स्पर्शाला जाणवेल, असा एक ठळक डॉट असला पाहिजे, असा एक जागतिक नियम आहे. या पाच नंबरवरील डॉटमुळे तो नंबर पॅड समजून घेऊन ती वस्तू अंध व्यक्ती सहजपणे वापरू शकते. आजवर असंख्य अंध व्यक्ती याच पद्धतीने टेलिफोन, मोबाईल, कॅल्क्युलेटर आदी वस्तू वापरीत आल्या आहेत. शिवाय प्रत्यक्ष नंबर प्रेस करीत असताना पॅडटोनचाही उपयोग नंबर दाबला गेल्याच्या खात्रीसाठी अंध व्यक्तीला होतो, परंतु आलेल्या फोनचा नंबर वाचणे, सहजपणे नंबर सेव्ह करणे, कॉन्टॅकमध्ये जाऊन हवा असलेला नंबर शोधणे, मॅसेज वाचणे किंवा अचूकपणे लिहून पाठवणे आणि मोबाईलची इतर अन्य फिचर्स वापरणे अंध व्यक्तीला शक्य होत नव्हते.

पुढील मजकूर पान ८ वर



संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर
नवाकाळ
।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

# मंकीमॅन टोळीची अफवा आणि माकडचेष्टा

गेल्या काही दिवसांपासून मुंबईच्या पूर्व आणि पश्चिम उपनगरांमध्ये मंकीमॅन किंवा चड्डी बनियन टोळीच्या नावाखाली वेगवेगळ्या अफवा पसरत आहेत. हे मंकीमॅन माकडासारख्या उड्या मारून रात्रीच्यावेळी चोऱ्या-माऱ्या किंवा वस्तू लंपास करतात. तसाच प्रकार चड्डी बनियन टोळीचे चोरटेही करतात. असा प्रचार जोरात सुरू आहे. विशेषत: वेगवेगळ्या उपनगरांमध्ये चाळीतल्या रहिवाशांमध्ये मंकीमॅन किंवा तशा प्रकारच्या टोळीविषयी उगाचच भीती निर्माण केली गेली. अजूनही ही अफवा थांबलेली नाही. रात्रीच्यावेळी पहारा देण्याचे काम त्या-त्या चाळीतले लोक करीत असतात. परंतु आता त्या टोळ्यांपेक्षा या पहारा देणाऱ्या लोकांचाही वेगळाच त्रास त्याठिकाणी येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना होत आहे. त्या मंकीमॅन टोळीची अफवा किंवा चड्डी बनियन टोळीचा धुमाकूळ असल्याचा प्रचार इतक्या मोठ्याप्रमाणात वाढला की पोलिसांना त्याची गंभीर दखल घ्यावी लागली. पोलिसांना ही अफवा आहे हे समजावून सांगण्याकरिता अक्षरश: जीवाचा आटापीटा करावा लागला. आम्हाला एकाच गोष्टीचे आश्चर्य वाटते की, मुंबईसारख्या आधुनिक महानगरामध्ये अशा प्रकारची अफवा पसरते आणि लोक त्यांच्यावर विश्वासही कसा ठेवतात. नुसताच विश्वास ठेवत नाहीत तर या अफवेची दहशतच पहायला मिळते. शिकल्या-सवरलेल्या लोकांमध्ये जर अशा प्रकारचा गैरसमज पसरत असेल तर ग्रामीण भागामध्ये अशा प्रकारच्या अफवा पसरवून अनेक लोक अंधश्रध्देची दुकानदारी सहजपणे करीत असावेत. साधारणपणे गेला महिनाभर या मंकीमॅनविषयी सतत काही ना काही ऐकायला मिळत आहे. ज्या पध्दतीने या प्रकाराचे वर्णन केले गेले किंवा दहशत माजवली गेली ती पाहिल्यावर मंकीमॅन टोळीच्या नावाखाली काही समाज कंटकांच्याच माकडचेष्टा चालू आहेत की काय असे वाटायला लागले, कदाचित एक दोन ठिकाणी दोन चार माथेफिरूंनी झाडावरून उड्या मारून दोन चार वस्तू पळवल्याही असतील. परंतु त्या तेवढ्याशा प्रकारावरून मंकीमॅन नावाचा शब्द रुढ झाला आणि त्याची शहरभर चर्चाही सुरू झाली. ज्यावेळी त्याचा खरे खोटेपणा तपासला गेला त्यावेळी त्याचा कुठल्यातरी छोट्याशा प्रकाराने ही अफवा पसरली असे आढळून आलेले आहे. अर्थात प्रत्येकालाच स्वत:च्या सुरक्षिततेची चिंता असते. अशावेळी जर कुठे काही गडबड वाटली तर लोक सावध होतात आणि आपल्या स्वत:च्या सुरक्षिततेसाठी वेगवेगळ्या कल्पना लढवून त्याचा प्रचारही करतात. तसेच या मंकीमॅन टोळीबाबत घडलेले दिसते.

### सामान्य माणसाला सुरक्षा महत्त्वाची

आज विचार करण्यासारखी गोष्ट एवढीच आहे की मुंबईसारख्या प्रगत महानगरीमध्ये अशा प्रकारच्या अतिशय सवंग प्रकाराने धुमाकूळ घालावा आणि लोकांनी त्यावर विश्वास ठेवावा ही गोष्टच मनाला पटत नाही. परंतु त्यातला छोटासा मुद्दा असा आहे की सामान्य माणूस आज या महानगरात ज्या परिस्थितीत राहतो त्याचा विचार केला तर तो स्वत:च्या सुरक्षिततेला महत्त्व देणाराच असतो. मात्र ज्यावेळेला मंकीमॅन किंवा चड्डीबनियनसारख्या टोळीला अफवेची दहशत निर्माण होते त्यावेळी हे प्रकार का घडतात त्याचाही विचार करणे आवश्यक ठरते. त्यातून दुसरा महत्त्वाचा अर्थ असा निघतो की लोकांना आज पोलीस यंत्रणा किंवा सरकारी मदतीवर विश्वास राहिलेला नाही. एखाद्या गोष्टीपासून पोलीस संरक्षण करतील किंवा जनतेला होत असलेल्या त्रासाचा सरकारतर्फे नायनाट होईल याचीच लोकांना खात्री वाटत नसते. आणि मग ज्यावेळेला कुठेतरी चार-दोन जणांना लुबाडले जाते किंवा लुटले जाते त्यावेळेला तसे इतरांचे होऊ नये म्हणून खबरदारीचे उपायही योजले जातात. पोलिसांपर्यंत पोहचण्याआधीच त्या-त्या ठिकाणचे लोक आपापली डोकी लढवून उपाय शोधून काढतात. कदाचित या प्रकाराबाबत पोलिसांकडे धाव घेतल्यानंतरही जी मदत तातडीने घ्यायला हवी होती ती त्या लोकांना मिळाली नसावी. कारण आपल्या पोलीस यंत्रणा या कशा पध्दतीने काम करतात याचा अनेकांना अनुभव आहे तक्रार करायला गेल्यानंतर तुम्हाला ताबडतोब दिलासा मिळण्याऐवजी तुमचीच कानउघाडणी करण्याचे अफलातून प्रकार पोलीस स्टेशनमध्ये होतात. कायद्याचा कीस पाडला जातो. तक्रार करून तुम्हीच कसे अडकाल अशी भीती घालण्यापासून ते सेटलमेंटच्या भाषाही वापरल्या जातात, तेव्हा पोलिसांकडे जाऊनही उपयोग होणार नाही. उलट आपल्याच डोक्याला त्रास करून घेण्याकरता आपणच आपली सुरक्षितता जपावी या उद्देशाने लोकांनी मंकीमॅन विरोधात आघाडी उघडली असावी.आणि मग गर्दीच्या मानसशास्त्राच्या हिशोबाप्रमाणे राईचा पर्वत केला गेला. अस्तित्वात नसलेल्या मंकीमॅन टोळीच्या नावाने माकडचेष्टा केल्या गेल्या.

### पोलीस यंत्रणांचा धाक उरलेला नाही

या घटनेपासून सगळ्यांनाच एक धडा घेता येऊ शकतो. लोकांमध्ये इतक्या वेगाने अफवा का पसरते कारण आपल्याकडे त्या त्या यंत्रणा कधीही सक्षम नसतात किंवा जागेवर नसतात. त्यापूर्वीच उपाययोजना होण्याच्या दृष्टीने किंवा लोकांना माहिती व्हावी या उद्देशाने एकाकडून दुसऱ्याकडे ती चर्चा रवाना होते आणि अफवा पसरत जाते. एकतर या गोष्टीची खातरजमा केली पाहिजे आणि त्यात जर काही अर्थ नसेल तर त्याला विरोधही केला पाहिजे. सामान्य माणूस त्याच्या दररोजच्या धावपळीमध्ये कसेतरी आयुष्य जगत असतो. त्यात जर पुन्हा अशा प्रकारच्या काही घटना घडल्या तर तो आणखीनच धास्तावतो. म्हणजेच समाजाने किंवा सामान्य माणसाने निभयतेने जगावे इतकी शंभर टक्के सुरक्षितता आमचे मायबाप सरकार आम्हाला देऊ शकत नाही. हे त्यातले सत्य आहे. जर का एकूणच आपली पोलीस यंत्रणा सुदृढ आणि सक्षम असेल तर अशा टोळ्या धुडगूस घालण्याचे धाडसही करू शकणार नाहीत आणि लोकही अफवा पसरवणार नाहीत. परंतु तेवढा पोलीस यंत्रणेचा धाकही समाजकंटकांवर राहिलेला नाही. पोलिसांना किंमत न देता समाजाला वाटेल तसा त्रास देता येऊ शकतो, अशी खात्री समाजकंटकांना वाटते आणि म्हणून अशा अफवांचेही पीक येते.हे लक्षात घेतले पाहिजे.

## वसंत विहार स्कूलचा विजयाचा चौकार



ठाणे, ता.४ - येथील साळगावकर स्पोर्ट्स क्लबतर्फे सेंट्रल मैदानावर घेण्यात आलेल्या १३ वर्षांखालील पाचव्या गोविंद पाटील स्मृतीचषक आंतरशालेय क्रिकेट स्पर्धेत सलग चौथे जेतेपद पटकावून वसंत विहार स्कूलने विजेतेपदाचा चौकार मारला. अंतिम फेरीत वसंत विहार स्कूलने सरस्वती सेकंडरी हायस्कूलचा सहज पराभव केला.

वसंत विहारच्या सर्वेश खापरेने सुरेख गोलंदाजी करताना ७ धावांत ३ बळी टिपले. उपांत्य फेरीत वसंत विहारने श्री माँ विद्यालयाचा, तर सरस्वतीने सरस्वती सेकंडरी हायस्कूल, नौपाडा संघावर मात केली. क्रिकेटपटू अजिंक्य रहाणे, निनाद रणदिवे, प्रभाकर सातघरे, रीतेश सोळंकी आणि किरण साळगांवकर यांच्या हस्ते स्पर्धेचा बक्षीस समारंभ पार पडला.

अरविंद महाडेश्वर, आशिष कर्णिक यांनी पंच म्हणून काम पाहिले. तर स्कोअरर म्हणून मंगेश कदम यांनी काम पाहिले. परितोषिक विजेतेः- सर्वोत्तम फलंदाज- शंकर बालसुब्रमण्यम, गोलंदाज- सर्वेश खापरे, क्षेत्ररक्षक- हार्दिक नायर (सर्व वसंत विहार स्कूल), स्पर्धावीर- अभिषेक पवार (सरस्वती सेकंडरी हायस्कूल, नौपाडा).

## रोनाल्डोची शानदार हॅट्रिक

माद्रिद, ता.४ - येथे सुरू असलेल्या स्पॅनिश लीग साखळी फुटबॉल स्पर्धेत बलाढ्य रिअल माद्रिद संघाने आपली विजयी दौड कायम राखताना लेवेस्ट स्पोर्ट्स क्लबचा ४-२ गोलांनी आरामात पराभव केला. त्यांचा स्टार खेळाडू ख्रिस्तियानो रोनाल्डो विजयाचा शिल्पकार होता.

यंदाच्या मोसातील सहावी हॅट्ट्रिक रोनाल्डोने या सामन्यात नोंदविली. आतापर्यंत झालेल्या २२ लढतींमधील माद्रिद संघाचा हा १९वा विजय होता. माद्रिद संघाने या स्पर्धेत ५८गुण मिळवून अव्वल स्थानावर झेप घेतली आहे. तर त्यांचा प्रतिस्पर्धी बार्सिलोना क्लब तब्बल १० गुणांनी मागे असून त्याचे ४८ गुण झाले आहेत.

## इंडिया सिमेंट अजिंक्य

नवी मुंबई, ता. ४ - येथील डी.वाय. पाटील स्टेडियमवर झालेल्या अखिल भारतीय टी-२० चषक क्रिकेट स्पर्धेत चेन्नईच्या इंडिया सिमेंट कंपनीने बाजी मारली. अंतिम सामन्यात त्यांनी यजमान डी.वाय. पाटील संघाचा ४ गडी आणि २ षटके राखून आरामात पराभव केला. विजयी संघासमोर अवघे १५५ धावांचे लक्ष्य होते. दिनेश कार्तिक ४८ आणि हेमांग बदानी ४२ यांच्या तुफानी फटकेबाजीने इंडिया सिमेंटला सहज विजय मिळवून दिला.

## मुंबई महापालिका विजयी

मुंबई, रविवार - आझाद मैदानावर सुरू असलेल्या मॅग्नेट कॉर्पोरेट ढाल क्रिकेट स्पर्धेत मुंबई महानगरपालिकेने बॉम्बे हॉस्पिटलचा ३ गडी राखून पराभव करून तिसरी फेरी गाठली. विजयी संघातर्फे एम. सुर्वेने ३६, तुकाराम राणेने नाबाद १७ धावा केल्या. राणेने अष्टपैलू खेळ करताना ४ बळीदेखील घेतले. त्याला प्रकाश सोळंकीने २ बळी घेऊन चांगली साथ दिली. पराभूत संघातर्फे संतोषने २८, प्रमोदने २७ धावा केल्या. या दोघांनी अष्टपैलू खेळी करताना अनुक्रमे २ व ३ बळीदेखील घेतले.

## युवा जलतरणपटू अनिकेत शेडगेचे यश



मुंबई, रविवार - नवी मुंबई येथील युवा जलतरणपटू अनिकेत शेडगेने नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या 'स्केअर ऑफ मुंबई स्विमथॉन' जलतरण शर्यतीत छान यश संपादन केले. १९ ते २१ वयोगटात त्याने सर्वात वेगवान जलतरणपटू होण्याचा मान मिळविला. तसेच या गटात तो पहिला आला. अनिकेतने ०.४१.१६ मिनिटांची वेळ दिली.

याच गटात पुण्याचा केविन बोराने देखील तशीच वेळ दिल्यामुळे अनिकेत आणि केविनला आयोजकांनी संयुक्तपणे प्रथम क्रमांक दिला. अनिकेत गेली ७ वर्षांपेक्षा जास्त काळ स्पर्धात्मक जलतरण करत असून आंतर कॉलेज जलतरण स्पर्धेत त्याने आपली सर्वोत्तम कामगिरी करत असताना पाचपेक्षा जास्त सुवर्णपदके जिंकली आहेत. डी. वाय. पाटील क्रीडा संकुलातील तरण तलावात तो नियमित सराव करतो. किशोर पाटील त्याचे प्रशिक्षक असून चार वर्षांपूर्वी झालेल्या याच शर्यतीत तो विशेष कामगिरी करू शकला नव्हता. पण यावेळी अनिकेतने शर्यतीपूर्वी खास सराव शर्यतीसाठी आठ, दहा दिवस केला होता. त्याचा फायदा त्याला झाला.

**शर्यतीचे इतर विजेतेः-**

महिला- वेदश्री बांद्रे, मुले १२-१४ वयोगटः- तन्मय पाटील, मुलीः- निधी शेट्टी, १५ ते १८ वयोगटः-नील देशमुख, मुलीः- नमिता मदगुंडी, पुरुष- २६ ते ३० वयोगट- शंकर जाधव, महिला ३० वर्षांवरील - मनीषा बेडगे मिस्के, पुरुष ३१ वर्षांवरील - संदीप भोईर, अपंग गट- स्वप्नील पाटील, सागर के., सुविया मुल्लानी.

## ओम साईने ठक्कर बाप्पा स्मृती चषक पटकाविला!

मुंबई, रविवार- बृहन्मुंबई महानगरपालिका मैदान, जॉगर्स पार्क, चिकूवाडी, शिंपोली, बोरिवली (पश्चिम) येथे नुकतीच १३ वी भव्य कै. किशोर लक्ष्मीदास ठक्कर बाप्पा स्मृतीचषक अपंगार्थ क्रिकेट स्पर्धा संपन्न झाली. ओम साई, बोरिवली हा संघ या स्पर्धेत अंतिम विजेता संघ ठरला. या संघाने चकाकता १३ वा ठक्कर बाप्पा स्मृती चषक पटकाविला. जय अंबे हा संघ या स्पर्धेत उपविजेता ठरला.

बोरिवली क्रिकेट असोसिएशन फॉर दी फिजिकली चॅलेंज व रोटरी क्लब ऑफ बोरिवली यांच्या संयुक्त विद्यमाने त्याचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत आठ संघांनी भाग घेतला होता.

ओम साई, बोरिवली व जय अंबे यांच्यातील अंतिम सामना रंगतदार झाला. ओम साई, बोरिवली संघाने प्रथम नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षण करण्याचे ठरविले. सहा षटकांच्या सामन्यात जय अंबे संघाने ५१ धावा केल्या. ओम साई, बोरिवली संघाच्या फलंदाजांनी धडाकेबाज फलंदाजी केली. त्यांनी ४ षटके ५ चेंडूंमध्ये विजयी लक्ष्य साध्य केले.

उत्कृष्ट गोलंदाज म्हणून अजय म्हात्रे, उत्कृष्ट फलंदाज अमर, उत्कृष्ट क्षेत्ररक्षक रवी पाटील व सामनावीर म्हणून योगेश याची निवड करण्यात आली. ज्येष्ठ नगरसेवक मोहन मिठबांवकर, काशिनाथ पाटील, विरार, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे महेश भोईर, रोटरी क्लब ऑफ बोरिवलीचे अध्यक्ष अजय गांधी, भाजपा अपंग विकास आघाडीचे अध्यक्ष राजेंद्र पुरोहित, बाबा अमरनाथ ग्रुपचे पदाधिकारी व अन्य उपस्थित होते.

ही स्पर्धा यशस्वी होण्यासाठी मकरंद भोसले, वासुदेव डांगिया, अनिल काशीकर, रवी पडवळ, दीपक नाचरे, राजू रावराणे, बाबू घाडीगावकर आदींनी परिश्रम घेतले.

## मॅकडोनाल्ड बंगलोर संघात

नवी दिल्ली, ता. ४- ऑस्ट्रेलियाचा अष्टपैलू खेळाडू अॅन्ड्र्यू मॅकडोनाल्डने यंदा होणाऱ्या आयपीएल क्रिकेट स्पर्धेत दिल्ली डेअरडेव्हिल्स संघाला गुडबाय करून बंगलोरच्या रॉयल चॅलेंजर्स संघात दाखल झालाय. मॅकडोनाल्ड चांगला खेळाडू असून त्याच्या अनुभवाचा फायदा बंगलोर संघाला नक्कीच होईल, असे बंगलोर संघाचे व्यवस्थापक अविनाश वैद्य यांनी सांगितले.

## मुखशुद्धी

बंटीने परीक्षेत हिंदी प्रश्नोत्तर असे लिहीले होते-

**प्रश्न:** पोटाचे कार्य काय?
**उत्तर:** अन्नाला सांभाळून ठेवणे.
**प्रश्न:** दौड-धूप म्हणजे काय?
**उत्तर:** ऊन्हात धावणे.
**प्रश्न:** दर्दनाक कशाला म्हणतात.
**उत्तर:** ज्याचे नाक दुखते.

## पंचांग

**सोमवार, ५ मार्च २०१२**
शके १९३३ खरनामसंवत्सर,
✻ फाल्गुन शुक्ल द्वादशी ● **नक्षत्र:** पुष्य
● रवी उदय ०६-५६, रवी अस्त १८-४४
**जन्मराशी:** ००-०१ ते २४-०० कर्क
समता दिन, गोविंद द्वादशी

संपादक, मुद्रक, प्रकाशक व संचालक: **सौ. जयश्री खाडिलकर-पांडे**
मुद्रक-प्रकाशन स्थळ : नवाकाळ प्रेस, १३ नवाकाळ पथ, खाडीलकर रोड, गिरगाव, मुंबई -४००००४. टेलिफोन : २३८८०९८१,
जाहिरात विभाग: २३८६०९८७,२३८४१५२४, फॅक्स नं.: २३८१०१७६
वितरणः २३८२४४६६, फॅक्स नं. : २३८६ ०९८९, २३८७ ४९११.
**कार्यकारी संपादक : रोहित पांडे**
info@navakal.org
http://navakal.org
'नवाकाळ ऑफिस व नवाकाळ प्रेस'चे प्रकाशन दैनिक 'नवाकाळ' आर.एन.आय.क्र.१८१४/५७
स्थापना ७ मार्च १९२३/ फाल्गुन वद्य ५ शके १८४४

## कविता
## माझा भारत देश महान

भारत हा माझा देश आहे
साऱ्या दुनियेत नाही अशी तिथे
लोकशाही नांदते आहे
तिथे असे, वरून लोकशाही
परि काही प्रमाणात असे, तिथे
केवळ झुंडशाही

जिथे ज्ञानासारख्या पवित्र क्षेत्रातही
खोट्या शाळा आणिक विद्यार्थी दाखवुनी
जनतेच्या पैशाची लूट केली, तरीही
त्यांचेवर खटल्याची नामोनिशाणी नाही
जिथे खटले चालू असलेले आरोपी
निकाल लागतोपरी

राज्याची धुरा वाहात आहेत
जिथे करोडोच्या घोटाळ्यांचे आरोपी
अशा, आंतरदेशीय स्पोर्टसच्या पदाधिकाऱ्याची
परत नेमणूक केली जाते
जिथे चारा घोटाळ्यात अडकलेले आरोपी
राज्याची धुरा वाहात आहेत
आणिक वर ते ऐश्वर्याचे जीवन
जगत असताना

गरीब जनता उपाशीपोटी जीव देत आहे
कारण? तो भारत माझा देश आहे
आणिक, तिथे खरी लोकशाही नांदत आहे

**- नाना परळकर**
मोबा.: ९९३०७ १५० ३२

# 'नवाकाळ'ची ९० वर्ष

## मनोगत

७ मार्च २०१२ ला होळीच्या दिवशी महाराष्ट्राचे लोकप्रिय दैनिक 'नवाकाळ' ९०व्या वर्षात पदार्पण करीत आहे. त्या निमित्ताने दैनिकाचे संपादक, वाचक, कर्मचारी, हितचिंतक, जाहिरातदार या सर्वांचे मनपूर्वक अभिनंदन.

नवाकाळच्या शेणरी वाडीतल्या कार्यालयापासून जवळच असलेल्या सदाशिव क्रॉस लेनमध्ये जरीवाला बिल्डिंगमध्ये मी अनेक दशके राहत होतो. त्यावेळी यशवंत कृष्णाजी खाडिलकर 'नवाकाळ'चे संपादक होते. निळुभाऊ खाडिलकरांचे चेस खेळातील त्यांचे विल्सन हायस्कूलमधील वर्गमित्र दुर्गादास गजानन मोंडकर आमच्याच बिल्डिंगमध्ये राहत असत. गिरगांवात किंवा मुंबईत काही महत्त्वाचे घडल की त्यांची शाहनिशा करण्यासाठी मी नवाकाळमध्ये जात असे. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत नवाकाळचा खप प्रचंड होदा. संध्याकाळचा वधारो त्यावेळी निघत असे. एसएससीचा रिझल्टच्यावेळी कार्यालयावर फार गर्दी असे. मुंबई केंद्रातल्या यशस्वी विद्यार्थ्यांची नावे व सिटनंबर त्यावेळी 'नवाकाळ' प्रसिध्द करी. १९६०च्या दरम्यानची गोष्ट असेल आजचे प्रसिध्द पद्मभूषण शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ अनंत माशेलकर हे त्यावेळी बोर्डात १४वे आले. त्यांना बोर्डात प्रथम अथवा दुसरा किंवा ३रा येणार अशी खात्री होती. ते हिरमुसले होते. 'नवाकाळ'मधून ते १४वे आले हे मला कळल होते. ते आमचे लेखक मित्र होते. सकाळी ९च्या सुमारास ते माझ्याकडे जरीवाला बिल्डिंगमध्ये आले व मी सायन्स जात नाही असे म्हणू लागले. मी म्हणालो तुझे पुढचे इंजिनिअर होण्याचे स्वप्न एसएससी रिझल्टवर अवलंबून नाही तर कॉलेजमधील इंटर सायन्सच्या रिझल्टवर अवलंबून आहे. निराश होऊ नकोस चर्चगेटचे जयहिंद कॉलेज घे. कारण त्यावेळेस इंटर सायन्सच्या निकालात बहुतेक वरचे क्रमाकांतील विद्यार्थी जयहिंद कॉलेजचे असत. त्यावेळेला पेपर सेंटर बहुतेक त्या कॉलेजचे असतात. असे सायन्सचे विद्यार्थी म्हणत. तितला स्टाफ व लॅबोरेटरी उत्तम दर्जाची होती. पुढे माशेलकर ज्याला मी त्याचे कुटुंबिय रमेश म्हणत तो जयहिंद कॉलेजमधून इंटर सायन्स झाल्यावर पुढे युडीसिटीमधून केमिकल इंजिनिअर झाला.

दुसरे आमचे मित्र दत्ताराम आत्माराम बारस्कर. तेही 'नवाकाळ'मध्ये सहाय्यक संपादक म्हणून होते. त्यांनाही मी बराच वेळेस 'नवाकाळ'मध्ये जाऊन भेटत असे. माशेलकर खेतवाडीजवळ नानुभाई देसाई रोडवर राहत असत. तर वारस्कर कुंभार वाड्यात.

'नवाकाळ'च्या ९० वर्षातील पदार्पणाच्या वेळी या सर्व जुन्या आठवणींना परत उजाळा मिळत आहे. व म्हणूनच मला खूप समाधान वाटत आहे.

नवाकाळची अशीच उत्तरोत्तर प्रचंड प्रगती होवो, अशी श्री गणेशचरणी प्रार्थना.

**आपला हिंतचिंतक**
**केशव नाईक**




# नवाकाळ

मुंबई, सोमवार ५ मार्च, २०१२ पान - ८




# अंधांसाठी मोबाईल

(पान १ वरून चालू)

जगभरातील अंधांची ही गरज लक्षात घेऊन आधुनिक डिझिटल तंत्रज्ञानाआधारे लिखित अक्षरांचे ध्वनित रूपांतर करून आवाजाच्या माध्यमातून मजकूर ऐकू येऊ शकेल, अशी सॉफ्टवेअर्स पाश्चात्य जगातील काही संगणकतज्ज्ञांनी तयार केली. ह्या टेक्स्ट टू स्पीच सिस्टीम सोबतच्या स्क्रीन रिडर्स सॉफ्टवेअर्समुळे, मोबाईलच्या स्क्रीनवर उमटणारे प्रत्येक अक्षर सॉफ्टवेअरमधील वॉईसद्वारे उच्चारले जाते आणि मोबाईलच्या ज्या स्पिकर्समधून आपल्याला रिंगटोन्स, गाणी आदी गोष्टी ऐकू येतात त्याच स्पीकर्समधून अक्षरस्वरूपातील मजकूरही ऐकू येतो. म्हणजे एखाद्याचा फोन आल्यानंतर आपणाला स्क्रीनवर त्याचा क्रमांक दिसतो तो ह्या सॉफ्टवेरमुळे स्पीकरमधून ऐकूही येतो. याच पद्धतीने क्रमांक वा अक्षरे टाईप करतानाही ती ऐकू येतात त्यामुळे आपण जी की प्रेस करीत आहोत ती बरोबर आहे की नाही हे अंध व्यक्तीला समजते व अत्यंत सहज आणि अचूकपणे टाईप करणेही शक्य होते. तसेच मोबाईलमधील सर्व मेनूज, ऑप्शन्सही या पद्धतीने उच्चारले, वाचले जात असल्यामुळे अंध व्यक्ती आता सर्वसाधारण डोळस व्यक्तींप्रमाणे बहुतेक सर्व फिचर्ससह मोबाईल वापरू शकत आहेत. म्हणजे केवळ कॉल लावणे किंवा आलेला कॉल अटेंड करणे नव्हे तर नावानीशी फोन नंबर सेव करणे, कॉन्टॅक्टमध्ये जाऊन हवा तो नंबर शोधणे, एसएमएस करणे, आलेले एसएमएस वाचणे, अगदी इंटरनेट वापरणे, जीपीएस सिस्टीम वापरणे हे सारेच या सॉफ्टवेरमुळे आम्हा अंध व्यक्तींना शक्य झाले आहे. एकूण काय तर हे सॉफ्टवेअर वापरून डोळस व्यक्ती मोबाईलमध्ये ज्या कृती पाहून करते त्या कृती अंध व्यक्ती ऐकून करते.

आजच्या वेगवान जगासोबत जुळवून घेण्यासाठी, स्वत:ची कृतिशीलता वाढवण्यासाठी आणि स्वावलंबी जीवन जगण्यासाठी अशा साधनांच्या माध्यमांतून मिळणारी ही सर्व स्वयंपूर्णता आमच्यासाठी खूप महत्त्वाची आहे. कारण एखादी अंध व्यक्ती एखाद्या अनोळखी ठिकाणी एकटी असताना अडचणीत सापडली आणि तिला मदतीची गरज असली तर डोळस व्यक्तीप्रमाणे एखादा टेलिफोन बूथ शोधणे, डायरीतून फोन नंबर शोधणे, त्या व्यक्तीस सहज शक्य नसते, अशा वेळी स्वयंभूपणे मोबाईल वापरण्याची त्याला मिळालेली सोय ही त्याच्यासाठी खूप महत्त्वाची असते. तसेच मोबाईलमध्ये असलेल्या म्युझिक प्लेयरचा वापर साधारणपणे गाणी ऐकण्यासाठीच केला जातो, पण अंध विद्यार्थी मात्र आपल्या अभ्यासाची पाठ्यपुस्तके आणि नोट्स वाचकांच्या आवाजात रेकॉर्ड करून घेतात आणि या मोबाईलच्या मेमरी कार्डमध्ये टाकून त्यातील म्युझिक प्लेयरद्वारे ऐकतात आणि अभ्यास करतात. यामुळे त्यांना कोणताही वेगळा म्युझिक प्लेयर वा डिस्कमॅन वापरण्याची आवश्यकता राहत नाही आणि ते हवा तेव्हा हवा तिथे अभ्यास करून आपला उत्कर्ष साधू शकतात.

मात्र ही सुसज्जता, हे स्वावलंबन आम्हाला सहज उपलब्ध होते असे नाही. वर उल्लेखलेल्या स्क्रीन रीडर सॉफ्टवेअरचा वापर कोणत्याही सर्वसाधारण मोबाईलमध्ये करता येत नाही. त्यासाठी (सिंबीअन) ही ऑपरेटिंग सिस्टीम असलेला मोबाईलच वापरावा लागतो. सध्या नोकिया व सॅमसंग या काही निवडक मोबाईल निर्मिती कंपन्याच ही ऑपरेटिंग सिस्टीम असलेले मोबाईल्स तयार करीत आहेत आणि त्यांची किंमतही किमान ८००० रुपये आहे. तसेच वर सांगितल्याप्रमाणे अंध व्यक्ती म्हणून आम्हाला मोबाईल वापरात स्वावलंबन मिळवून देणारे टॉक्स वा स्पीक हे दोनच मोबाईल स्क्रीन रीडर्स सध्या बाजारामध्ये उपलब्ध आहेत, ज्यांची किंमतही किमान ५००० आहे.

म्हणजे जी सोय डोळस व्यक्तींना आज ३ ते ५ हजारांत मिळते ती मिळवण्यासाठी अंध व्यक्तींना किमान १२ ते १५ हजार रुपये खर्च करावे लागतात. परंतु बहुसंख्य अंध व्यक्तींचे मासिक उत्पन्नही या आकड्यांच्या आसपास असत नाही. ग्रामीण भागातील अंध तर अशा सुविधांपासून वंचितच आहेत. विद्यार्थ्यांकडे विद्यार्थीदशेत इतकी क्रयशक्तीही नसते. मी वर सांगितलेल्या बाबी लक्षात घेतल्या तर मोबाईल ही अंधांसाठी चैनिची वस्तू नसून आवश्यक गरज आहे, हे लक्षात घेऊन शासनाने अंधांना अशा मोबाईल खरेदीवर सबसिडी देणे गरजेचे आहे. पण ही मागणी मान्य होण्याची शक्यता फारच थोडी आहे.

# कृपाशंकर यांची नाशिकमध्येही मालमत्ता

नाशिक, ता.४- बेहिशेबी मालमत्ता जमा केल्याप्रकरणी वादग्रस्त ठरलेल्या कृपाशंकर सिंह यांची शहरालगत चिंचोळे शिवारात लाखोंची मालमत्ता असून या ठिकाणी त्यांची शाळा सुरू करण्याची योजना असल्याचे समजते. नाशिक-त्र्यंबकेश्वर रोडलगत चिंचोळी शिवारात गट क्रमांक ६४ मध्ये ही जमीन आहे.

या जमिनीवर काही प्रमाणात बांधकाम झाले असून संध्या त्या ठिकाणी विनाभाडेतत्वावर काही कुंटुबीयांना राहतात. या कुंटुबियांना फक्त विजबीलच भरावे लागते. या वीजबिलावर कृपाशंकर सिंह यांचे नाव असून सातबाराच्या उताऱ्यावर कृपाशंकर सिंह यांच्यासह इतर नऊ जणांचा समावेश आहे.कृपाशंकर सिंह यांच्या मालमत्तेच्या आजुबाजुला सर्वत्र परप्रांतीय नागरिकांचीच मालमत्ता आहे.

## कशेडी घाटात बस कोसळली

(पान १ वरून चालू)

(५५), रवींद्र माने (५३), सुनंदा माने (६०), अमोल ढमढेरे (३०), बशीर वस्त (४०), गझिया वस्त (३५), राफीया वस्त (२०), प्रशांत बरे (३९), रवीकुमार बाबा (३५) आणि शीला साळवी (४०) अशी आहेत. याशिवाय चालक ज्ञानेश्वर कदम आणि मारुती जाधव यांची प्रकृती गंभीर असून त्यांना डेरवणच्या वालावलकर हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल केले आहे. तर इतर जखमींवर प्राथमिक उपचार करून त्यांना घरी पाठविण्यात आले. या अपघाताबाबत पोलीस अधिक तपास करीत आहेत.

## झेडपी निवडणुकीमध्ये शिवसेनेची गद्दारी करणाऱ्यांना मतदारांचे चोख उत्तर

पोलादपूर, ता. ४ - नुकत्याच झालेल्या झेडपी आणि पंचायत समितीच्या निवडणुकीमध्ये शिवसेनेशी गद्दारी करून राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षात गेलेल्यांना मतदारांनीच चोख उत्तर देत घरचा रस्ता दाखविल्याचा दावा महाड-पोलादपूर- माणगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार भरतशेठ गोगावले यांनी केला.तालुक्यातील हळदुळे येथील विठ्ठल रखुमाई मंदिराबाहेरील सभामंडपाच्या नूतनीकरणाच्या कामाचे उद्घाटन एका छोटेखानी समारंभात आ. गोगावले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी झेडपी सदस्य तथा तालुकाप्रमुख चंद्रकांत कळंबे, माजी तालुकाप्रमुख अंकुश सकपाळ, प्रताप कुमठकर, वाकण सरपंच संजय मोदी, अप्पा चाळके आदी पदाधिकारी व शिवसैनिक उपस्थित होते. महाड व पोलादपूर तालुक्यातील सर्वाधिक झेडपीच्या जागा जिंकून विधानसभेची परीक्षा पास झाल्याचा आनंद व्यक्त करीत आता जनतेनेच घरात बसविलेल्या अन्य पक्षियांना चिंता करू नये, असा सल्लाही आमदार गोगावले यांनी यावेळी दिला.

# हातावर घड्याळ बसताच लोखंडाचे सोने झाले

(पान १ वरून चालू)

जितेंद्र आव्हाड यांच्याविरोधात अपहरणाचा गुन्हा दाखल केला आहे.

आज शिवसेना-भाजपाने ठाणे बंद केला. काल रात्रीपासूनच 'बंद'ला सुरुवात झाली. मुलुंड चेकनाक्यापासून बसेस व रिक्षाची तोडफोड सुरू झाली. शिवसेनेचे एकनाथ शिंदे, राजन विचारे आणि प्रताप सरनाईक हे तीन आमदार व डझनावारी नगरसेवक संपूर्ण ठाणे शहरभर फिरून ठाणे बंद करीत होते. त्यामुळे ठाणे पूर्णपणे बंद होते. ठाण्याची सर्व दुकाने बंद होती. ठाण्याचे सर्व व्यवहार ठप्प झाले होते. भाजपा नगरसेविका सुहासिनी लोखंडे यांची हत्या झाल्याचाही आरोप शिवसेनेचे नेते एकनाथ शिंदे यांनी केला. आणि या सर्व आरोप नाट्यानंतर नगरसेविका सुहासिनी लोखंडे 'स्टार माझा' या वृत्तवाहिनीशी बोलल्या आणि शिवसेनेचे सर्व आरोप त्यांनी खोटे पाडले. त्या म्हणाल्या, मी सुरक्षित आहे. माझ्यावर कुणाचा दबाव नाही.माझे अपहरण झाले ही अफवा आहे. त्यामुळे या अपहरणाच्या बातम्या थांबवा म्हणजे तोडफोड थांबेल. मी जे बोलत आहे. त्याची हेडलाईन बनवा म्हणजे तोडफोड थांबेल. मी इथे देवदर्शनासाठी आले असून सुरक्षित आहे. माझी एवढ्या वर्षांची निष्ठा शिवसेना-भाजपावर आहे. ती मी कायम ठेवणार आहे. मी सहा तारखेला ठाण्याच्या महापालिका सभागृहात मतदानाला येणार आहे. मी येणार होते. मात्र हे सगळे चाललेले आहे त्यामुळे मी नंतर येणार आहे. मी माझे मत बनविले आहे. मी माझ्या इच्छेप्रमाणे मतदान करणार आहे.

### तुमच्या शोले पिक्चरमध्ये आम्हाला रस नाही

शिवसेना-भाजपाच्या टीकेला उत्तर देताना राष्ट्रवादीचे महापौरपदाचे उमेदवार नजीब मुल्ला यांनी सुनावले की, सुहासिनी लोखंडेबाबतच्या तुमच्या रचलेल्या रसभरीत 'शोले' पिक्चरमध्ये आम्हाला रस नाही. शिवसेना-भाजपाच्या घरच्या भांडणासाठी बंद कशाला? ठाणेकरांना कशाला वेठीला धरता. उद्या तुमच्या घरातून कोणी पळून गेले तर त्यासाठी ठाणे बंद करणार का? असा सवाल नजीब मुल्ला यांनी विचारला.

सुहासिनी लोखंडे 'स्टार माझा'शी बोलल्यानंतर शिवसेना व भाजपाने पुन्हा राष्ट्रवादी कॉंग्रेसवरच तोफ डागली. आता जितेंद्र आव्हाड व त्यांच्या राष्ट्रवादीवर दबाव आल्याने त्यांनी सुहासिनी लोखंडे यांना मिडियासमोर पेश केले, असा आरोप भाजपाचे ठाणे शहर अध्यक्ष संदीप लेले यांनी केला.

त्यानंतर आमदार जितेंद्र आव्हाड यांनी पत्रकार परिषद घेऊन महायुतीची खिल्ली उडविली. ते म्हणाले, ठाण्याचा महापौर निवडायला अजून ५० तास बाकी आहेत. या ५० तासांत राजकारणातील अनेक गणिते बदलू शकतात. महायुतीतील ८० टक्के नगरसेवक माझ्या संपर्कात आहेत. हे पुराव्यानिशी सिद्ध करू शकतो. शिवसेनेला गेले दोन महिने फक्त जितेंद्र आव्हाडच दिसतो. मारामाऱ्या, मत फोडणे, अपहरण, ही कामे मी करीत नाही. सत्तेत आहे त्यांची ही परंपरा आहे. मला 'वाय' दर्जाची सुरक्षा आहे. मी कुठेही जातो ते पोलिसांना माहीत असते. शिवसेनेची सत्ता मोडीत निघते म्हणून ते सैरभैर झाले आहेत. आपला हरविलेला आत्मविश्वास परत मिळविण्यासाठी शिवसेना-भाजपाचा हा केविलवाणा प्रयत्न आहे. यांचा आत्मविश्वास हरवला म्हणून त्यांनी ठाणेकरांना वेठीस धरले. ठाणेकरांना १३० नगरसेवकांना निवडून दिले. ते नगरसेवक महापौर निवडतील ना! त्यासाठी ठाणेकरांना वेठीला का धरता? काल रात्रीपासून यांनी ४५ बसेस फोडल्या. तुम्ही ठाणे पालिकेचे कस्टोडियन आहात ना! मग संरक्षण करायचे सोडून बसेस कशा काय फोडता. आधीच त्यांनी टीएमसीची वाट लावली आहे. आता ठाणे पालिका आयुक्तांनी या ४५ बसेस फोडल्याबद्दल सेना-भाजपावर गुन्हा नोंदविला पाहिजे. तसेच 'बंद' करणे हा देखील गुन्हा आहे. त्यामुळे तो देखील गुन्हा नोंदविला पाहिजे.




## येवल्यात ५ मार्च रोजी शिष्यवृत्ती मेळावा

येवला, ता. ४ - मागासवर्गीय विद्यार्थ्यांना व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शासनाने शिष्यवृत्ती न देण्याचा अचानकपणे निर्णय घेतल्याने येवल्यात सोमवार ५ मार्च रोजी राज्यस्तरीय शिष्यवृत्ती अधिकार मेळावा सत्यशोधक विद्यार्थी संघटनेने आयोजित केला आहे. सामाजिक न्याय विभागाने शिष्यवृत्ती न देण्याचा निर्णय घेतल्याने मागासवर्गीय विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भवितव्य अंधारत सापडले आहे. सामाजिक न्याय विभागाने चालू शैक्षणिक वर्षामध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांमध्ये शिष्यवृत्तीसाठी ऑनलाईन अर्ज भरून घेंतल्यानंतर डिसेंबर २०११ मध्ये शिष्यवृत्ती न देण्याचा निर्णय घेतला आहे. बी.सी.ए., बी.बी.ए., बी.बी.एम.,बी.सी.ए., आदींसह सुमारे ११७५ व्यावसायिक अभ्यासक्रमांधील विद्यार्थ्यांसह अन्याय झाला आहे.

सन २००६ मध्ये एका अध्यादेशाद्वारे मागासवर्गीय विघार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचा जो निर्णय घेतला होता. त्यात सुधारणा करीत शासकीय कोट्यातून प्रवेश घेतलेल्या व तंत्रशिक्षण विभागाची मान्यता असलेल्या अभ्यासक्रमांमधील विद्यार्थ्यांसह शिष्यवृत्ती देण्याचा अध्यादेश काढला आहे.




